# श्री रामचंद्र मिशन
# एकोज इंडिया

सप्टेंबर 2008 खाजगी वितरणासाठी खंड 1 अंक 5


प्रिय बंधू भगिनींनो,

लखनौ येथे साजरा झालेला पू. गुरुदेवांचा वाढदिवस कार्यक्रम व त्यांच्या आध्यात्मिक आशिर्वादांच्या स्मृती आपल्या सर्वांच्या मन:पटलावर अद्याप तरंगत असतील. खरोखरच त्यांना शब्दात व्यक्त करणे अशक्य आहे. या अंकामध्ये, कार्यक्रमाचा विस्तृत वृत्तांत, गुरुदेवांचे विविध केंद्रांचे दौरे, मीरत आश्रमाचे उद्घाटन, अनेक ओपन हाऊस कार्यक्रम, प्रशिक्षण कार्यक्रम इ. ठळकपणाने आहेत.

युनायटेड नेशन्स व एस आर सी एम च्या संयुक्त विद्यमाने घेण्यात येत असलेली निबंध स्पर्धा सध्या आपल्या भारतातील विविध आश्रमात व केंद्रात मुख्य उपक्रम झाला आहे.

नोव्हेंबरच्या अंकासाठी बातम्या पाठविण्याची शेवटची तारीख १० ऑक्टोबर २००८ आहे. कृपया बातम्या व त्या प्रसंगाचा फोटो आपल्या झोनल प्रमुखांच्यामार्फत पाठवावे.

एकोज इंडिया न्युजलेटर टीम.






## पू. गुरुदेवांचा ८१ वा वाढदिवस – लखनौ.

२० जुलै रोजी गुरुदेवांचे कोलकत्याहून विमानाने आगमन होताच कार्यक्रमाच्या वातावरणनिर्मितीला प्रारंभ झाला. लखनौ आश्रमात जवळजवळ ४२००० अभ्यासी व मुले जगभरातून एकत्र आली होती. हरदोई बायपासवर लखनौ शहरापासून २५ कि.मी. अंतरावर आय आय एम कॅम्पसला लागूनच हा आश्रम आहे.

२३ जुलैच्या सत्संगानंतर युनोच्या नवी दिल्ली स्थित कार्यालयाचे श्री राजीव चंद्रन यांनी युनोच्या मिलेनियम डेव्हलपमेंट गोलबद्दल व शांतता, सलोखा, समानता आणि प्रतिकूल परिस्थितीमध्ये राहणाऱ्या लोकांच्या विशेषत: स्त्रियांच्या सबलीकरणासाठी केल्या जात असलेल्या कार्याची माहिती दिली.

त्यानंतर दिलेल्या संस्मरणीय अशा भाषणामध्ये गुरुदेवांनी श्री रामचंद्र मिशन, जात, धर्म, भाषा, राष्ट्रीयत्व अशा सर्व प्रकारच्या अडथळ्यांना दूर करून सर्वत्र मानवजातीमध्ये कसा बंधूभाव निर्माण करीत आहे याकडे लक्ष वेधले. मिशनने आतापर्यंत दोन हजार विवाह संपन्न केले असल्यामुळे यामधून एका नवीन मानवतावादी समाजाची निर्मीती होण्यासाठी मार्ग मोकळा झाला आहे.

गुरुदेवांनी भर दिला की महिलांचे सबलीकरण हे फक्त प्रेमातूनच होऊ शकते. ते म्हणाले,'' त्यांच्यावर प्रेम करा, त्यांची काळजी घ्या व रक्षण करा.'' त्यांनी ही गोष्ट निदर्शनास आणून दिली की बाहेर समाजात भारतीय महिला जरी त्यांच्या पतीच्या काही पाऊले मागे चालत असलेल्या दिसल्या तरी घरात मात्र त्या राणी असतात !

२४ जुलैच्या सकाळचा प्रारंभ, गुरुदेवांचे ध्यानमंडपात आगमन होताच, सैन्यदलातील वाद्यवृंदाने सादर केलेल्या वाढदिवसाच्या गाण्याच्या धूनने झाला. सकाळच्या सत्संगानंतर अकरा विवाह संपन्न झाले. त्या नंतरच्या भक्तीसंगितामधून, गाण्यांमधून व कवितांमधून गुरुदेवांबद्दलचे प्रेम जागृत झाले.

ध्यानकक्षाच्या व्यासपीठावर मागच्या बाजूला बाबूजी महाराज व चारीजींचे फोटो होते व त्याचा मुख्य आशय 'निरंतर एकत्र' (Together forever) असा होता. या तीन दिवसांच्या कार्यक्रमात एकूण ३६ विवाह सपंन्न झाले. त्यापैकी ९ जोडपी विदेशातील होती. गुरुदेवांनी या उत्सवादरम्यान बऱ्याच नवीन पुस्तकांचे सी.डी., डीव्हीडींचे प्रकाशन केले. ही द हुक्का ॲंड आयची पुढील आवृती 'हबल, बबल'मध्ये गुरुदेवांच्या भाषणांचे संकलन असलेल्या पाच डीव्हीडींचे सुध्दा प्रकाशन झाले.

मान्सून असल्यामुळे पाऊस आत येणार नाही अशा पध्दतीची व्यवस्था सर्वत्र केलेली होती त्यामुळे सगळीकडे पाऊस असूनही अभ्यासींना सुरक्षित वाटले. ज्या स्वयंसेवकांनी व संयोजकांनी रात्रंदिवस राबून हे शक्य केले त्या सर्वांचे गुरुदेवांनी कौतुक केले. निवास, सुरक्षा, वाहतूक, पादत्राणे व्यवस्थापन, स्वच्छता विभाग, वैद्यकीय, विवाह विभाग, उपहार गृह, मदत केंद्र, लहान मुलांसाठी केंद्र, पाणी व्यवस्थापन, अंतर्गत सफाई तसेच बॅंक व इंटरनेट सुविधापण केलेली होती. या सर्व विभागांची देखभाल स्वयंसेवकच करीत होते.

गुरुदेव येणाऱ्या लोकांना भेट देण्यात व मिशनच्या जगभरातील कार्यकर्त्यांनी केलेल्या संस्थेच्या प्रशासकीय कामाचा आढावा घेण्यात व्यस्त होते. मिशनच्या कार्यकारी कमिटीसोबत देखील काही काळ व्यतीत करून त्यांनी मिशनच्या कार्याचा व भविष्यातील योजनांचा आढावा घेतला.

२५ जुलै ०८ च्या सकाळच्या सत्संगानंतर काही भक्तीगीते झाली व मिशनचे सेक्रेटरी बंधू यु.एस.बाजपाई यांच्या समारोपाच्या भाषणाने कार्यक्रमाची सांगता झाली.







## गुरुदेवांचा दौरा – जून १५ ते ऑगस्ट २००८

### बेंगलोर

दोन महिन्याच्या युरोपियन दौऱ्यानंतर रविवार दि. १५ जून २००८ रोजी दुबईहून गुरुदेवांचे आगमन झाले. त्यांना घेण्यासाठी नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळावर बेंगलोर व आसपासच्या अभ्यासींचा मोठा समूह जमला होता.

सध्या बांधकाम चालू असलेल्या लालाजी निलायम (त्यांनी आता याचे नाव परमधाम ठेवण्याचे ठरविले आहे) मेडीटेशन सेंटर मध्ये गुरुदेवांनी सत्संग घेऊन काही विवाह संपन्न केले. बेंगलोरच्या पूर्वेला, दक्षिणेला व उत्तरेला असलेल्या तीन आश्रमाबद्दल व या भागातील अभ्यासींची हे आश्रम घेत असलेल्या काळजी बद्दल, त्यांनी भाष्य केले. छोट्या भाषणातून त्यांनी स्वयंशिस्तीच्या आवश्यकतेवर भर दिला. नवीन डीव्हीडी संच " ही, द हुक्का ॲन्ड आय – संच २ : हबल बबल" साठी त्यांनी प्रस्तावना दिली.

गुरुदेव २० ते २६ जून या कालावधीत 'क्रेस्ट'मध्ये राहिले. कर्नाटकातील विविध केंद्रांमधून सतत अभ्यासींचा ओघ चालू होता. एस.एम.एस.एफ लायब्ररी सभासद कार्डांचे उद्घाटन गुरुदेवांनी केले. या कार्डाचा उपयोग कोणत्याही एस.एम.एस.एफ च्या ग्रंथालयामध्ये केला जाऊ शकतो. या प्रसंगी ते म्हणाले की या सर्व ग्रंथालयांसाठी मुद्दाम निवडलेल्या या पुस्तकांचा उपयोग धर्म व अध्यात्म यांचे विस्तृत ज्ञान मिळवून सखोल चिंतन करण्यासाठी झाला पाहिजे.

फ्रान्सहून आलेल्या २५० कि. वजनाच्या घंटीच्या क्रेस्ट येथील उभारणीच्या कामात सखोल लक्ष घालून त्याचे उद्घाटन गुरुदेवांनी आनंदाने केले. मोटारीने नेत्रमपल्लीला ते रवाना झाले व चेन्नईला जाता जाता २८ जूनच्या रात्री तेथे मुक्काम केला.

चेन्नई येथे, दोन ते अडीच महिन्याच्या कालावधीनंतर आपल्या प्रिय व्यक्तीला भेटण्यासाठी मोठ्यासंख्येने जमलेल्या अभ्यासींनी त्यांचे स्वागत केले. मोटारीच्या प्रवासानंतर सुद्धा कॉटेजमध्ये येताच गुरुदेवांनी अभ्यासींना वेळ दिला.

६ जुलैच्या सकाळच्या सत्संगानंतर 'ही, द हुक्का ॲन्ड आय' या पुस्तकाची तमिळ आवृत्ती गुरुदेवांनी प्रकाशित केली. अभ्यासींना भेटण्यासाठी व लालाजी मेमोरियल ओमेगा इंटरनॅशनल स्कूलला भेट देण्यासाठी त्यांच्याकडे नेहमीच वेळ असतो. त्यांनी दहावीच्या मुलांना चांगला अभ्यास करण्याचे आवाहन केले कारण शाळेतून उत्तीर्ण होऊन बाहेर पडणारी त्यांची पहिली तुकडी असेल.








▲ Bangalore



▲ Naukuchiatal



▲ Chennai



▲ Satkhol



▲ Shahjahanpur



▲ Satkhol



▲ Ghaziabad

कोलकत्याला जाण्यासाठी १४ जुलैला गुरुदेव निघाले. तेथे १८ जुलैच्या गुरूपोर्णिमे दिवशी त्यांच्या सानिध्यात राहण्यासाठी भारतातील सर्वदूरचे अभ्यासी जमले होते. २४ जुलैच्या लखनौ कार्यक्रमासाठी ते २० ता.स रवाना झाले.

लखनौ येथील कार्यक्रमानंतर गुरुदेव २८ ता.स मोटारीने शाहजहॉपूरला गेले. शाहजहॉपूर येथे बाबूजींच्या घरी जाऊन तेथे उपस्थित थोड्या अभ्यासींसाठी सत्संग घेतला. नंतर ते आश्रमाकडे गेले. तेथे सत्संग घेतला व तेथील अभ्यासींच्या सोबत काही काळ थांबून दुपारी रुद्रापूरकडे निघाले.

गुरुदेव २९ रोजी दु. ३:३० वा. सतखोलला पोहचले. वाटेत नवकुचियातल येथे थोडा वेळ थांबले होते.

३० च्या सकाळी सत्संग घेतल्यानंतर एका बंधूच्या सुश्राव्य गाण्याचा आनंद त्यांनी घेतला. सतखोलची ही एक छोटीशी यात्रा संपवून गुरुदेव वाटेत रुद्रापूर व मोरादाबाद येथे थांबत मेरठकडे रवाना झाले.

## गुरुदेवांच्या हस्ते मीरत आश्रमाचे उद्घाटन

१ ऑगस्ट रोजी सतखोलहून दिल्लीला परत येताना गुरुदेवांनी वाटेत छोटासा वळसा घेऊन, मोजक्याच लोकाना सोबत घेऊन मीरत केंद्राला छोटीशी भेट दिली. वाटेत मोरादाबाद येथे अल्पोपहार घेऊन मीरत आश्रमात ते दाखल झाले. येथे नवीन ध्यानकक्ष व मास्टर कॉटेज तयार झालेले होते. उद्घाटनाप्रित्यर्थची फित कापून व कोनशिलेचे अनावरन करून गुरुदेवांनी हा आश्रम बाबूजी महाराजांना अर्पण केला.सत्संग घेतल्यानंतर जमलेल्या १५०० अभ्यासींच्या समुहासमोर गुरुदेवांनी भाषण केले. ते विनोदाने म्हणाले की रावणाची पत्नी मंदोदरी ही मीरतची होती, परंतु एका राक्षस कुटुंबातील असूनही ती एक चांगली स्त्री होती.
त्यांच्या भाषणातील महत्वाचे मुद्दे खालील प्रमाणे,
– आपण शांत राहण्याचा संकल्प केला पाहिजे म्हणजे अंतर्गत कलह कमी होईल.
– आंतरिक किंवा बाह्य निर्माण करा – दोन्ही शक्य नसते.
– आपण कमीत कमी काय करावयाचे नाही हे तरी ठरविले पाहिजे.
– पवित्र कमाई व पती पत्नीमध्ये आध्यात्मिक संबंध आवश्यक आहे.
गुरुदेव आणखी म्हणाले की अभ्यासींनी जातीवाचक नावे काढून टाकली पाहिजेत व त्याची नोंद नोटरीकडे करून त्यांना कळविले पाहिजे. स्वत: बाबूजी महाराजांनी काही काळानंतर त्यांचे आडनाव काढून टाकले होते. गुरुदेव दुपारी दिल्लीकडे मोटारीने रवाना झाले.












# प्रकाशन विभाग
## नवीन प्रकाशने





### हबल बबल
यावर्षीचे हे एक विशेष प्रकाशन आहे. गुरुदेवांनी 'ही, द हुक्का अॅन्ड आय' च्या मालिकेत पुढे केलेली भाषणे या मध्ये आहेत. त्यामधील गुरुदेवांच्या शब्दात, "आमच्या सर्व अभ्यासींना मी निसर्गाच्या हाकेला प्रतिसाद देण्याचे आवाहन करतो. आपली वाट पहात असलेल्या विराणतेला प्रतिसाद द्या, जेथे पाहण्यासाठी काही नसेल, काळजी घेण्यासाठी काही नसेल, आकांक्षा ठेवण्यासाठी काही नसेल, प्राप्त करण्यासाठी व त्याहीपेक्षा गमविण्यासाठीही काही नसेल, आणि जोपर्यंत आपण त्या हाकेला प्रतिसाद देत नाही तोपर्यंत दाढी ही दाढीच राहते, हुक्का हा हुक्काच राहतो व धूर देखील धूरच राहतो. मात्र आपल्यासाठी ते हबल बबल असेल".
या डी व्ही डीं च्या सोबत सुंदर अशा वेष्टणामध्ये बंद केलेले, ही भाषणे छापलेले, एक पुस्तक असेल.

### डी व्ही डी सेट जुलै २००८



डी व्ही डी सेट २००८ मध्ये, गुरुदेवांनी सन २००५ ते २००७ या कालावधीत व्रॅड डेन्मार्क, चेन्नई, बेंगलोर व तिरुपूर येथे दिलेली भाषणे आहेत.


### हिंदी प्रकाशने



लखनौ उत्सवात २ ऑडिओ सी डी मध्ये गुरुदेवांची भाषणे प्रकाशित झाली. गुरुदेवांच्या १९८५ ते १९९६ दरम्यानच्या १४ हिंदी भाषणांचा संग्रह भाग १ मध्ये आहे. 'प्रेम ही ईश्वर है' या नावाच्या दुसऱ्या सी डी मध्ये सन १९९३ ते १९९४ दरम्यान गाझियाबाद, कोटा ,बेहज व इन्दौर येथे दिलेली भाषणे आहेत.

### मास्टर्स चॉईस
संगितातील आमच्या तज्ञ बंधू भगिनींनी गायलेल्या गाण्यांचा संग्रह २ सी डीं च्या संचमध्ये मास्टर्स चॉईस म्हणून प्रकाशित झाला.

### हार्ट स्पीक २००७




गुरुदेवांनी सन २००७ मध्ये भारतात व विदेशात दिलेल्या सर्व भाषणांचा संग्रह असलेले हे पुस्तक आहे. या व्यतिरिक्त, या पुस्तकात, २००६ व २००७ मध्ये गुरुदेवांचा अभ्यासींसोबत झालेला अनौपचारिक वार्तालाप पण सम्मिलीत आहे.

## उत्तराखंड–व्ही बी एस ई साठी शिक्षकांना प्रशिक्षण

डेहराडून आश्रमात, दि.२८ ते २९ जुन २००८ दरम्यान आयोजित प्रशिक्षण शिबिरात उत्तराखंड मधील ७० अभ्यासी व उ.प्र.तील ९ अभ्यासींनी भाग घेतला.

उत्तराखंडचे झोनल इन्चार्ज बंधू एम एल मित्तल यांनी प्रशिक्षणार्थींचे स्वागत केले. भगिनी निरा रघुवंशी यांनी व्ही बी एस ई च्या पार्श्वभूमीवर प्रकाश टाकून 'स्मृतीने' व्ही बी एस ई शिक्षकांना मार्गदर्शिका उपलब्ध करण्याचा मुद्दा मांडला.

डेहराडूनचे बंधू आर एस चौहान यांनी, राज्य सरकारने शाळांमध्ये व्ही बी एस ई सुरू करण्याची परवानगी दिली असल्यामुळे, अभ्यासींना शिक्षकांचे प्रशिक्षण देण्याच्या आवश्यकतेवर भर दिला.

या प्रशिक्षण कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे भगिनी चंद्रकांता व प्रिती यांनी विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य वापरून, गोष्टींद्वारे उदाहरणाद्वारे व काही प्रयोगांमधून वर्गामध्ये व्ही बी एस ई कशाप्रकारे आमलात आणता येईल याची अनेक प्रात्यक्षिके करून दाखविली. बंधू जी डी सरीन व रमेश दलकोटी यांनी पण शिकविण्यामध्ये भाग घेतला.

चहापानानंतर गटवार उपक्रम सुरू झाले. चार गट पाडण्यात आले.

गट क्र.१– या गटात वर्गामध्ये जाऊन व्ही बी एस ई शिकविण्यास तयार असलेले स्वयंसेवक होते.

गट क्र.२– हा गट शिक्षकांना वैयक्तिकरित्या भेटून व्ही बी एस ई बद्दल माहिती देणाऱ्या स्वयंसेवकांचा होता.

गट क्र.३ – या गटातील स्वयंसेवक शिक्षकांच्या गटाला व अभ्यासींना व्ही बी एस ई चे प्रशिक्षण देतील.

गट क्र.४ – या गटात व्हि बी एस ई बद्दल संस्थाचालकाना भेटून चर्चा करणारे स्वयंसेवक होते.

या प्रत्येक गटातील प्रत्येक अभ्यासीला त्या गटाची भूमिका परिक्षकांच्या व इतर गटांसमोर वठविण्याची संधी दिली गेली.

कार्यक्रमाच्या समारोपाप्रसंगी बंधू एम एल मित्तल, झोनल इन्चार्ज उत्तराखंड यांनी सर्वांचे आभार मानून आशा व्यक्त केली की सर्वजण मिळून गुरुदेवांच्या इच्छेनुरूप व्ही बी एस ई चे कार्य पुढे चालू ठेवतील.







## निबंध लेखन

श्री रामचन्द्र मिशन ही संस्था, युनायटेड नेशन्सच्या डिपार्टमेंट ऑफ पब्लिक इन्फॉर्मेशनशी संलग्न, एन जी ओ म्हणून डिसें. २००५ पासून कार्यरत आहे. या योजनेअंतर्गत युनायटेड नेशन्सच्या उद्दिष्टांची व कार्याची तसेच जागतिक समस्यांबद्दलची माहिती लोकांपर्यंत पोहचविण्याचे व त्यामधून लोकांच्या मध्ये या कार्याबद्दल जागृती निर्माण करण्याचे उत्तरदायित्व आपल्या मिशनकडे येते.

युनायटेड नेशन्सच्या, १२ ऑगस्टच्या, अंतरराष्ट्रीय युवादिना निमित्त देशभरातील शाळा व कॉलेजमध्ये श्री राम चंद्र मिशनतर्फे अखिल भारतीय निबंध स्पर्धेचे आयोजन केले जाईल.

'मोठ्या गटासाठीचा (१७ ते २४ वर्षे) 'सेल्फ रिस्पेक्ट अँड सेल्फ कॉन्फिडन्स कॅन शेप वन्स कॅरेक्टर' तर छोट्या गटासाठी (१० ते १६ वर्षे) 'ट्रुथ इज करेज' हे विषय आहेत.

निबंध लेखनासाठी शेवटची तारीख ३१ ऑगस्ट आहे.

## गुलबर्गा, कर्नाटक.



गुलबर्गा आश्रमातील मास्टर कॉटेजसमोरील हिरवळीवर ६ जुलै २००८ रोजी अभ्यासींच्या मुलांसाठी निबंध लेखन स्पर्धा घेतली गेली.

विषय होता, " सहजमार्गात आल्यानंतर त्यांच्या पालकांमध्ये व नातेवाईकांच्या मध्ये मुलांना कोणते बदल झालेले दिसले."

वेगवेगळ्या वयोगटातील ११ मुलांनी भाग घेतला. ही एक छोटीशी सुरवात आहे व पुढे चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे.

## नंजनगुड–कर्नाटक.

म्हैसूर जवळ मंदिरांसाठी प्रसिद्ध असलेल्या नंजनगुड या शहरातील अभ्यासी जेव्हा तेथील शाळांमध्ये अखिल भारतीय निबंध स्पर्धेसाठी तेथील विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविण्यासाठी गेले तेव्हा त्यांना उत्साहवर्धक अनुभव आला. त्यांच्या या प्रयत्नामुळे १३ शाळांमधील १०५ विद्यार्थ्यांनी १३ जुलै २००८ रोजी आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेमध्ये भाग घेतला. स्थानिक शिक्षक अभ्यासींनी या निबंधांचे मूल्यांकन करून मिशनची पुस्तके बक्षीस म्हणून त्या शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना वाटली.





## " केंद्राच्या वाढीमध्ये मी सहभाग कसा नोंदवू शकतो?"

इन्दौर केंद्रातील अभ्यासींना हा प्रश्न १० ऑगस्ट २००८ रोजी विचारला गेला. त्यांची लखनौ उत्सवातील उपस्थिती प्रोत्साहन देणारी ठरली होती आणि त्यांनी ( १२५ ) अत्यंत उत्साहाने या विषयावर विचार व्यक्त केले.

"वाढ" या शब्दाचा अर्थ काय? संख्येपेक्षाही अभ्यासींची वैयक्तिक उन्नती आणि परिवर्तन महत्वाचे आहे.

ऐच्छिक कामातून आपली प्रगती होते.

"केंद्र" ही संकल्पना आपल्या प्रगतीसोबत स्थानिक वरून वैश्विकतेकडे फैलावते.



अंतिम सारांश असा होता, " आपला मुख्य सहभाग ' त्यांना ' सहकार्य करणे हा असून ते आपल्यावर करीत असलेल्या कामामध्ये आपल्या मानवी इच्छेमधून प्रतिरोध न करता, आपल्या भल्यासाठी कोणत्याही अटीविना ' त्यांचे ' आज्ञापालन करणे हा आहे."

## नेतृत्वगुणांसाठी कल्पक कार्यशाळा

निष्ठावान स्वयंसेवकांसाठी दि. २२ जुन २००८ रोजी आयोजित अशा आगळ्या वेगळ्या कार्यशाळेचे स्थळ होते बडोदा आश्रम. एका कारखान्यातील व्यावसायिक प्रशिक्षकाने घेतलेल्या या कार्यशाळेत ३ प्रशिक्षकांसह २५ अभ्यासींनी सहभाग नोंदविला.

प्रभावी निवेदन, समस्या निवारणातील कल्पकता, कामासोबतच संबधित लोकांची काळजी घेणाऱ्या नेतृत्वाचे आकलन, प्रासंगिक नेतृत्वासाठी लागणाऱ्या गुणांची आवश्यकता इ. गुणांवर भाषणे झाली. अगदी क्षुल्लक भासणाऱ्या समस्यांवर सहभागींना कल्पकतेतून विचार करून तोडगा शोधण्यास सांगितले गेले, असे करीत असताना एकमेकांचे अनुभव समजून घेऊन त्यापासून बोध घेण्यास सांगितले. मिशनच्या विविध स्वयंसेवी कामासोबतच मोठ्या उत्सवामध्ये स्वयंसेवकांची कामे करताना लागणाऱ्या अनेक नेतृत्वगुणांचा उल्लेख सहभागींनी केला.



## युवांसाठी प्रगत प्रशिक्षण– अहमदाबाद



"उत्साहामुळे फरक पडतो " हा विषय होता २२ जुन २००८ रोजीच्या झोनल एकदिवशीय कार्यशाळेचा , ज्यामध्ये गुजरातमधील ४५ अभ्यासींनी भाग घेतला. अभ्यासींचे ५ गट पाडण्यात आले व त्यांना नाटिकेसाठी, गटवार चर्चेसाठी, 'उचला आणि बोला' साठी तसेच प्रश्नोत्तरांच्या सत्रांमध्ये प्रशिक्षकांनी मार्गदर्शन केले. समारोपानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम झाल्यानंतर भोजनाचा कार्यक्रम झाला.

एक गोष्ट निदर्शनास आली ती म्हणजे निवडलेल्या विषयाप्रमाणे दिवसभर कार्यक्रमाच्या हॉलमध्ये उत्साह भरून वाहत होता. कार्यक्रमाचे संचलन करणारे ज्येष्ठ अभ्यासी देखील याला अपवाद नव्हते.

## निवेली ( तामिलनाडू ) येथील आध्यात्मिक संमेलन

निवेली हे लिग्नाईट खाणीमुळे ( ब्राऊन कोल ) प्रसिद्ध आहे. २९ जून २००८ रोजी मिशनच्या या केंद्राने स्थानिक व आसपासच्या कडलोर, पॉंडिचरी, विलुपुरम, रिदाचलम आणि पानरुती येथील केंद्रातील १४० अभ्यासी व १५ मुलांसाठी एका दिवसाचा कार्यक्रम ठेवला होता.

तीन 'एम' वर आधारित प्रश्नमंजुषा झाल्यानंतर अभ्यासींची, प्रेम, सहनशिलता, निष्ठा, बंधुभाव इ. विषयांवर छोटी भाषणे झाली. यामधून त्यांच्यामध्ये आवड निर्माण होऊन त्यांचा सहभाग वाढला. अभ्यासींनी सादर केलेल्या नाटिकेसोबतच एका अभ्यासी दाम्पत्याची मुलाखात घेतली गेली. त्यांच्या जीवनावर सहजमार्गाचा पडलेला प्रभाव ऐकताना हा इतरांचे अनुभव समजून घेण्याचा एक प्रभावी मार्ग ठरला. यामध्ये आणखी भर म्हणजे सत्संगाचा अर्थ सांगणारे सादरीकरण दोन अभ्यासींनी प्रस्तुत केले. त्यानंतर चर्चा होऊन त्याचा खुलासा करण्यात आला.





## प्रशिक्षण उपक्रम

### धनबाद

कोलकता, राणिगंज, धनबाद, सिंदरी, बोखारो व गिरिदिह येथील ८० अभ्यासींनी २८ व २९ जूनला दोन दिवसांच्या कार्यक्रमात उपस्थिती नोंदविली. बंधू वाय पी के मुर्ती, केंद्रप्रमुख धनबाद यांना या कामी इतर केंद्राचे अभ्यासी स्वयंसेवक व प्रशिक्षकांचे सहकार्य लाभले.

पहिल्या दिवसाचे वैशिष्ट होते ध्यान, शुध्दीकरण व प्रार्थनेवरील सादरीकरण. संध्याकाळच्या ओपन हाऊसचा विषय होता,"सहजमार्ग साधना – एक जीवन पध्दती". प्रशिक्षकांच्या भाषणानंतर प्रशिक्षकांची व निमंत्रितांची विचारांची देवाण घेवाण फारच चांगली झाली.

दुसऱ्या दिवशी प्रश्नोत्तराचा कार्यक्रम ठेवला होता. त्यानंतर ' सहजमार्गात येण्यापूर्वी व आल्यानंतर ' या विषयावर गटवार चर्चा फारच प्रभावी व यशस्वी झाली. अभ्यासींनी हृदयापासून विचार मांडले. त्यांच्या अनुभावातून बऱ्याच चमत्कारांची माहिती मिळाली तसेच आपण सहजमार्गात प्रवेश केल्यापासूनच सदगुरू आपल्यासोबत निरंतर असतात ही गोष्ट प्रकर्षाने जाणवली.

### तिनसुकीया



तिनसुकीया आश्रमामध्ये २९ जून रोजी पार पडलेल्या अभ्यासी प्रशिक्षणामध्ये तिनसुकीया व जवळपासच्या दिबरुगढ, शिवसागर, नजिरा, दिगबोई, डमडम, नहारकटीया, दुलियाजान व अरुणाचल येथील २०० पेक्षा जास्त अभ्यासी उपस्थित होते.

गुरुदेवांच्या यातना, सदाचार, सहजमार्ग साधना इ. विषयांवर सादरीकरण झाल्यानंतर प्रश्नोत्तरे झाली. बंधू अशोक सेनगुप्ता यानी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. त्यांनी गुरुदेवांच्या या शिकवणीचा उच्चार केला, "आपल्याला जे काही मिळते ते इतरांमध्ये' वाटले पाहिजे." त्यांनी गुरुदेवांच्या गोवा येथे नुकत्याच झालेल्या भाषणाचा उल्लेख केला की, प्रत्येक अभ्यासीने दर वर्षी एक नवीन अभ्यासी आणला तर केंद्र सहज वाढेल.

बाबूजी महाराज तिनसुकीयाला बऱ्याच वेळा आलेले फोटो दाखवून या गोष्टीवर भर देण्यात आला की या भागासाठी बाबूजींनी जे स्वप्न पाहिले त्याची पूर्तता आजतागायत आपण करू शकलेलो नाही परंतु आपण जर हे कार्य 'इथेच व आत्ताच' या पध्दतीने घेतले तर गुरुदेवांच्या कृपेने 'त्यांचे' स्वप्न साकार करणे शक्य होईल.

### गुलबर्गा

गुलबर्गा येथील आश्रमात ६ जुलै रोजी नवीन अभ्यासींसाठी एक दिवसाचा प्रशिक्षण उपक्रम घेतला गेला. २५ अभ्यासींनी भाग घेतला. सहजमार्ग साधनेच्या मूलत्तत्वांवर जास्त भर देण्यात आला. भाषणांना प्रश्नोत्तराची जोड देऊन विवेचन करण्यात आले.



### दिल्ली केंद्रातील युवा कार्यशाळा

६ जुलै २००८ रोजीची कार्यशाळा दिल्लीच्या युवा अभ्यासींसाठी एक नवीन व उत्साहवर्धक अनुभव होता. मुख्य विषय होता, "तुम्हाला जे काही प्राप्त करावयाचे आहे ते इथेच आणी आत्ताच." अभ्यासींचे ८ गट पाडण्यात आले व त्यांना समन्वयकांनी मार्गदर्शन केले. चर्चेसाठीचे विषय होते, संतुलन, प्रेम, श्रद्धा, धीर, इच्छाशक्ती, इथेच आणी आत्ताच, शिस्त व वेळ. स्वामी विवेकानंदांच्या ,'उत्तिष्ठत जागृत' या आवाहनावर आधारित एक नाटिका युवा अभ्यासींनी सादर केली.

गुरुदेवांनी युवांना भौतिक क्रांतीमधील आकांक्षा व ध्येयाच्या मागे लागण्याच्या आध्यात्मिक धोक्याला बळी न पडण्याचा दिलेला इशारा आठवून देऊन खालील तत्त्वांवर भर देण्यात आला. मनाचा वापर सारासार विचार करून व शिस्तीने करावयाचा आहे. प्रत्येक दिवस अध्यात्माला प्राधान्य देऊन व्यतीत केला पाहिजे व उच्च प्रकारचे कार्य हाती घेतले पाहिजे जेणेकरून जीवनात आनंद निर्माण होईल.

### सिलीगुडी

सिलीगुडी व आसपासच्या रायगंज, दार्जिलिंग, बिजोनबरी आणि गंगटोक येथून आलेल्या ५० अभ्यासींना सहजमार्ग साधनेची सखोल माहिती या कार्यशाळेत देण्यात आली. रिशीभवन सिलींगुडी येथे ७ व ८ जून २००८ दरम्यान सहजमार्ग साधनेवर दोन दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन केले गेले. वैयक्तिक सिटींग व सत्संगाबरोबरच दैनंदिन साधना, सतत स्मरण आणि दहा नियमांवर सविस्तर सांगण्यात आले. त्यांच्या मनातील सर्व शंकांचे निरसन झाल्यामुळे नवीन अभ्यासींसाठी ही कार्यशाळा फारच उपयुक्त ठरली. अशा कार्यशाळांचे वरचेवर आयोजन करण्यात यावे असे अनेकांना वाटले.

## ओपन हाऊस सत्र

### दिब्रुगढ

दिब्रुगढ केंद्रामध्ये बंधू डुंगरमल अगरवाल यांनी ओपन हाऊसचे आयोजन केले. ३३ निमंत्रितांच्या पैकी ९ जणांनी सिटिंग घेतले तर आणखी काही जणांनी लवकरच साधना सुरू करण्याची इच्छा दर्शविली. गुवहाटी केंद्राचे श्री अशोक सेनगुप्ता यांनी कार्यक्रमाचे संचलन केले.

### नंदयाल, आंध्रप्रदेश

मुन्सिपाल्टी हायस्कूल नंदियाल येथील अदांजे १५० शिक्षकांसाठी तीन बॅचमध्ये दि. ४ ते ८ जुन दरम्यान योग व ध्यान या विषयाची ऑळख करून देण्यासाठी कार्यक्रम घेतला गेला. संतुलित व तणावमुक्त जीवन कसे जगावे यावर सविस्तर चर्चा झाली. २६ जुन रोजी पुलोजीराव एज्युकेशन कॉलेज नंदियाल येथे "सहजमार्गाची ध्यानाची पध्दत शिक्षकीपेशासाठी कशी उपयुक्त आहे आणि विध्यार्थ्यांमध्ये आध्यात्मिक मूल्ये कशी रुजविता येतील ? " या विषयावर आपल्या अभ्यासी बंधूनी कार्यक्रम घेतला. ६० प्रशिक्षणार्थी–शिक्षकांनी या कार्यक्रमात भाग घेतला.

### मंदामारी, आंध्रप्रदेश

कारमल हायस्कूल, खिश्चन मिशनरी व्यवस्थापकांच्या विनंती वरून ७० शिक्षकांसाठी कार्यक्रम आयोजिला गेला. ध्यानाची आवश्यकता व वैयक्तिक अनुभव यावर काही अभ्यासी शिक्षकांनी भाषण दिले. मिशनची प्रार्थना शाळेच्या सूचना फलकावर लावली आहे.

### बडोदा, गुजरात



अलकापुरी येथील बडोदा हायस्कूल सभागृहात रविवार दि. ६ जुलै २००८ रोजी ९० शिक्षक व काही निमंत्रितांसाठी ओपन हाऊस घेतले गेले. वक्त्यांनी मांडलेल्या विषयांमध्ये, जीवनात अध्यात्माची आवश्यकता व ध्यानाचे महत्व, सहजमार्ग साधनेची प्रमुख वैशिष्ट्ये आणि त्याचा मानवी मनावरील परिणाम तसेच सहजमार्ग साधनेद्वारे वैयक्तिक जीवनामध्ये आलेले अनुभव इ.चा समावेश होता.

### गुलबर्गा : ग्रामीण पुढाकार




आयनोली या खेड्यातील एका अभ्यासीच्या घराच्या गच्चीवर दि. ६ जून २००८ रोजी एका कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. सहजमार्गावरील भाषणांच्या नंतर प्रश्न विचारण्यात आले. त्याच भागातील कनकपुरा या खेड्यामधील एका अभ्यासीच्या घरात असाच कार्यक्रम घेतला गेला. त्याला ३५ लोकांची उपस्थिती होती. हे दोन्ही कार्यक्रम खास ग्रामीण पध्दती प्रमाणे आयोजिले गेले व सहजमार्गाची ओळख अगदी सोप्या भाषेत करून देण्यात आली. हे कार्यक्रम श्रोत्यांना त्यांच्या सद्यस्थितीच्या पध्दती बद्दल पुनर्विचार करण्यासाठी प्रोत्साहन देणारे ठरल्याचे जाणवले.

### कोडाईकॅनाल, तमिळनाडू

तमिळनाडू राज्यात कोडाईकॅनाल हे एक थंड हवेचे ठिकाण आहे. तसेच हे मदुराई केंद्राचे उपकेंद्र आहे. मदुराई येथील प्रशिक्षकगण या भागात मिशनचे केंद्र उभारण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. भवनगांधी विद्याश्रम शाळेत १२ जुलै २००८ रोजी सहजमार्गाबद्दल २५ शिक्षकांना माहिती देण्यात आली. इच्छुक शिक्षकांना ध्यान सुरू करण्यासाठी सहाय्य केले जाईल असे आश्वासन तेथील प्राचार्यांनी दिले. प्रशिक्षक बंधू रामनाथन व अभ्यासी बंधू चंद्रप्रसाद कोडाईकॅनाल येथे राहतात व त्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.

### श्री शंकरा विद्यालय मॅट्रीक्युलेशन हायर सेकंडरी स्कूल

कोडाईकॅनाल येथे ८ ऑगस्ट २००८ रोजी २० शिक्षकांसाठी ओपन हाऊस घेण्यासाठी आपल्या मिशनला आमंत्रित करण्यात आले. सहजमार्गाची सविस्तर माहिती दिल्या नंतर प्राचार्यांसहित १३ शिक्षकांनी सिटींग घेण्याची तयारी दर्शविली.

### सिलीगुडी, पश्चिम बंगाल

सिलीगुडी व जलपायगुडी येथील अभ्यासींच्या पुढाकाराने ८ जून २००८ रोजी जलपायगुडी जिल्हा परिषद सभागृहामध्ये ओपन हाऊस घेतले गेले. स्थानिक शाळेतील बालवाडीच्या विद्यार्थ्यांच्या नृत्य व गायनाने कार्यक्रमाची सुरवात झाली. प्रशिक्षकांच्या भाषणा व्यतिरिक्त 'पॉवर पॉईंट' सादरीकरणाचा वापर करण्यात आला. ३५ निमंत्रितांची कार्यक्रमाला उपस्थिती होती, त्यापैकी बऱ्याच जणांनी साधने विषयी आणखी जाणून घेण्याची इच्छा व्यक्त केली.

## प्रकाश केंद्रे

### अहमदाबाद आश्रम

अहमदाबाद गांधीनगर महामार्गावरून जाताना नव्याने बांधलेला अहमदाबाद आश्रम दृष्टीस पडल्याशिवाय रहात नाही. आपल्या गुरुदेवांनी, त्यांच्या मागाच्या दौऱ्यावेळी, या आश्रमाचे उद्‌घाटन केले होते.

मिशनच्या भारतातील आश्रमांपैकी हा एकमेव ध्यानकक्ष षटकोनी आकाराचा आहे. हा एक आधुनिकतेने नटलेला, देखणा व कार्यासाठी अतिशय उपयुक्त ध्यानकक्ष आहे.

अहमदाबाद शहरापासून २५ कि.मी. वर स्थित ४.७५ एकरच्या भूखंडा वर वसलेल्या या आश्रम संकुलामध्ये ५ मुख्य इमारती आहेत; ध्यानकक्ष, मास्टर कॉटेज , डॉर्मिटरी, अपार्टमेंट ब्लॉक, स्वयंपाक गृह आणि कार्यालय.

### ध्यानकक्ष



ध्यानकक्षाची वास्तू ही एक अपरंपरागत अद्वितीय अशा ऋहृ–ठग्र (हायपरबोलीक पॅराबोलॉईडस) नवीन पध्दतीच्या कॉंक्रीट मेंब्रेन छताने आच्छादित आहे. षटकोनी आकाराच्या या ध्यानकक्षाच्या आत खांब विरहीत विशाल जागा असून गुरुदेव कोणत्याही भागात असले तरीही चहूबाजूने अडथळ्याविना दिसू शकतात.

या प्रकारच्या आकारामुळे सर्व बाजूने हवेचा नैसर्गिक झोत खालून वर जात असल्यामुळे कडक उन्हाळ्यात देखील आतील तापमान बऱ्याच अंशी कमी राखले जाते.

या ध्यानकक्षामध्ये २००० अभ्यासी बसू शकतात. आवश्यकते प्रमाणे दोन बाजूला आणखी आडोसा करून ज्यादा ५०० अभ्यासींची व्यवस्था केली जाऊ शकते.

### मास्टर कॉटेज

मास्टर कॉटेजची आखणी आकर्षक अशा पारंपारिक पध्दतीची आहे. मध्यभागी अंगण व त्याच्या भोवती मास्टर बेडरूम कम कार्यालय, लिव्हींग रूम, स्वयंपाकगृह आणि एक गेस्ट बेडरूम आहे.

कॉटेजच्या छताला वैशिष्ट्यपूर्ण उतरता आकार दिलेला आहे. आतील बाजूने लाकडी रंगाची छटा असून बाहेरील भागावर मेंगलोर टाईल्स आहेत.



### डॉर्मेटरीज

डॉर्मेटरीजमध्ये सारख्या आकाराच्या दोन मजली सहा इमारती असून त्यामध्ये ७५० अभ्यासी आरामशीर राहू शकतात.

डॉर्मेटरीच्या एका टोकाला अभ्यासी डॉक्टर चालवित असलेले एक छोटेसे क्लिनिक असून तेथे अभ्यासींना व सभोवतालच्या खेडूतांना वैद्यकीय सुविधा पुरविल्या जातात.

सहापैकी एका विभागात दृकश्राव्य उपकरणांची सोय केलेली असल्यामुळे त्याचा उपयोग प्रशिक्षण उपक्रम व सेमिनारसाठी करता येतो.

स्वयंपाकगृह प्रशस्त असून त्यामध्ये साठवण करण्यासाठी पुरेशी जागा असून धुण्यासाठी देखील जागा आहे. स्वयंपाकगृहाच्या वरच्या बाजूस आश्रम मॅनेजरचे निवासस्थान व सर्व सोयींनी युक्त कार्यालय आहे.



'एल' आकाराची एक अपार्टमेंट इमारत असून ती दोन मजली आहे. तिच्या मध्ये दोन बेडरूमच्या सहा व एका बेडरूमच्या नऊ सदनिका आहेत.

### भविष्यातील योजना

या आश्रमात, एक भोजनकक्ष, मुलांना खेळण्यासाठी जागा, चार कर्मचारी क्वार्टर्स, पावसाच्या पाण्याचे सुनियोजन, हिरवळ व वृक्षा रोपण तसेच सुसज्ज ग्रंथालय उभारण्याच्या योजना आहेत.

एकंदरीत, अहमदाबादचा हा आश्रम म्हणजे मिशनच्या भारतातील आश्रमामधील आणखी एक रत्न नक्कीच आहे. गुरुदेवांच्या कृपेने, भारताच्या या भागातील लोकांवर आध्यात्मिक प्रभाव टाकणारा एक स्त्रोत म्हणून हा आश्रम हमखास पुढे येईल.

**To subscribe to this Newsletter please visit http://www.srcm.org/centers/as/in/newsletter/index.jsp**
**For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org**

© 2008 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved.
"Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.
This message may be edited for content and is intended exclusively for the members of SRCM.